बीड । मंगळवार
२०.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ४९
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक • www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 






# बीडच्या विकासासाठी वाढीव निधी -उपमुख्यमंत्री अजित पवार

## •जिल्हा नियोजनाचा ५७५ कोटींचा आराखडा सादर

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयाच्या विकासासाठी मी स्वत: अर्थमंत्री म्हणून अधिकाधिक निधी देत आहे अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज दिली. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. आज झालेल्या बैठकीत जिल्हयाचा ५७५ कोटी रुपयांचा (सर्वसाधारण) आराखडा सादर करण्यात आला.







या बैठकीस पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने तसेच पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख उपस्थिती होती. समिती प्रतिनिधींमध्ये आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार सुरेश धस, आमदार प्रकाश सोळंके, आमदार धनंजय मुंडे आमदार नमिता मुंदडा, आमदार विजयसिंह पंडित आदींनी या बैठकीत सहभाग घेतला. वर्ष २०२४-२५ चा आराखडा ४८४ कोटी रुपयांचा होता ही संपूर्ण रक्कम १०० टक्के खर्च झाली आहे. याचा आढावा देखील आजच्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

# अजित दादांनी कंत्राटदाराला धरलं धारेवर

## •वैजनाथ मंदिराच्या पायऱ्यांच्या मुद्यावरुन सुनावले खडे बोल

परळी वै.। प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे बीडचे पालकमंत्री झाल्यानंतर (१९ मे) प्रथमच परळीच्या दौऱ्यावर आहेत. परळीतील विविध विकास कामे आणि महत्वपूर्ण बैठका आणि बीड जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर या दौऱ्याला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. अशातच उपमुख्यमंत्री अजित दादांनी बैद्यनाथ येथील मंदिरात जाऊन दर्शन घेतलं आणि



त्यानंतर त्या ठिकाणी करण्यात आलेल्या विकास कामाची पाहणी केली असता यावेळी अजित दादांनी कंत्राटदाराला धारेवर धरत खडे बोल सुनावल्याचे बघायला मिळाले आहे. बैद्यनाथ मंदिराच्या पायऱ्यांच्या मुद्यावरून ▶▶ उर्वरित पान २ वर

# उज्ज्वल निकम अनुपस्थित! विष्णू चाटेच्या वकिलांनी दोषमुक्तीचा अर्ज घेतला मागे

## •संतोष देशमुख खून प्रकरणात कोर्टामध्ये काय घडलं?

बीड । प्रतिनिधी

संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी बीडच्या विशेष मकोका न्यायालयात पार पडली. मात्र सोमवारी झालेल्या सुनावणीला विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम अनुपस्थित राहिले. सहाय्यक सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे यांनी काम



पाहिले. महत्त्वाचे म्हणजे विष्णू चाटेच्या वकिलांनी दोषमुक्तीच्या अर्ज मागे घेतला आहे. तर वाल्मिक कराडच्या वकिलांनी पुन्हा एकदा इलेक्ट्रॉनिक पुराव्यांची मागणी सरकारी पक्षाकडे केली आहे.संतोष देशमुख हत्या प्रकरणाची पाचवी सुनावणी आज बीडच्या विशेष न्यायालयात पार पडली. आरोपी वाल्मीक कराडचे वकील विकास खाडे व आरोपी विष्णू चाटेचे वकील राहुल मुंडे न्यायालयात हजर होते. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३ जून रोजी पार पडणार आहे. सुनावणी पार पडल्यानंतर सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे म्हणाले की, ▶▶ उर्वरित पान २ वर

# तुम्ही आ. विजयसिंह पंडित यांना साथ दिली, आता मी विकास रुपी बळ देण्याचं काम करणार : अजित पवार

## •गेवराईत १८ कोटी रुपयांच्या विकास कामांचे उद्घाटन आणि पि.टी.आर.चे वाटप
## •गेवराई शहराच्या हद्द वाढीसह इतर प्रश्न तात्काळ मार्गी लावणार अजित दादांचे आश्वासन

गेवराई । प्रतिनिधी

राज्यातील जनतेने या महायुतीला भरभरून प्रतिसाद देत महायुतीला कौल दिला. यामध्ये गेवराई विधानसभा मतदार संघातून तुम्ही विजयसिंह पंडित यांना भरघोस मताने निवडून देत खंबीर साथ दिली आसून आता मी सरकार म्हणून त्यांना विविध विकास कामासाठी भरघोस निधी देऊन बळ देण्याचे काम करणार आसल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी केले, तर आ. विजयसिंह पंडित यांनी प्रामुख्याने गेवराई शहराच्या हद्द वाढ व बायपास टू बायपास रस्त्यासाठी विशेष पाठपुरावा केलेला आसून मी जातीने लक्ष घालून हा प्रश्न तात्काळ मार्गी लावणार आसल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी गेवराईकारांना दिले. गेवराई येथे विकास कामांचा शुभारंभ व अतिक्रमण धारकांना हक्काच्या पी.टी.आर.चे वाटप करताना ते बोलत होते.



माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून १८ कोटी रु. किंमतीच्या विविध विकास कामांचा शुभारंभ व अतिक्रमण धारकांना हक्काच्या पी.टी.आर.चे वाटप महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या हस्ते ▶▶ उर्वरित पान २ वर

# निष्क्रिय पालकमंत्री अजितदादांचा राजीनामा लोकशाही मार्गाने निदर्शने करत मागणा-या आंदोलनकर्त्यांना पोलिस प्रशासनाने उचलले

## •अजितदादांची टगेगिरी सहन करणार नाही : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

मी एकेकाला सुतासारखं सरळ करीन अशा वल्गना करणा-या पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या बीड जिल्ह्यात टोळक्यांनी मारहाण करत व्हिडिओ प्रसारित करून दहशत निर्माण केली असुन कायदा व सुव्यवस्था बिघडली असुन ती राखण्यास पोलिस प्रशासन असमर्थ ठरत आहे.पोलिस प्रशासनाचा धाक राहिलेला नाही आणि पालकमंत्री अजितदादा यांचे पोलिस खात्यावर नियंत्रण नाही नसल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यास असमर्थ, पवनचक्की कंपन्यांकडून महसूल व पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने दडपशाही व खोटे खंडणीचे गुन्हे




दाखल असताना शेतकऱ्यांना न्याय देण्यास असमर्थ उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री महाराष्ट्र राज्य असुन तिजोरीच्या चाव्या हातात असताना बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना शासकीय मदत वेळेवर देण्यासाठी असमर्थ तसेच बीड शहरातील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी महावितरणचे थकीत ३३ कोटी रुपये वीजबिल नियोजन अथवा वित्त विभागातुन देण्यास असमर्थ तसेच बीड जिल्ह्यातील जलजीवन योजनेंतर्गत कामांसाठी २५० कोटी निधीची आवश्यकता असताना केवळ १४ कोटी रुपये मंजूर करून ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यास असमर्थ बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी बीडच्या पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, पांडुरंग हराळे, बीड जिल्हाध्यक्ष इंटक ▶▶ उर्वरित पान २ वर

# धनंजय मुंडे यांच्या मागणीला यश

## परळीतील जुन्या थर्मलच्या जागेत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासह नवीन संच उभारणीचा प्रस्ताव सादर करण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आदेश; वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासाच्या कामांना निधीची कमतरता भासणार नाही कामे दर्जेदार पद्धतीने वेळेत पूर्ण करा अजित दादांचे निर्देश

परळी वै. । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या परळी दौऱ्यात धनंजय मुंडे यांच्या एका महत्त्वाच्या मागणीला यश आले आहे. परळी येथील जुन्या औष्णिक विद्युत केंद्राच्या जागेत बंद असलेल्या संच क्रमांक १ ते ५ च्या जागेत नवीन मेगा सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे यासह नवीन थर्मल ▶▶ उर्वरित पान २ वर






# खा.सोनवणेंनी मांडल्या शेतकऱ्यांच्या व्यथा

## •पीक कर्जाची मर्यादा वाढविण्याची बैठकीत मागणी

### जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खा.सोनवणे बनले शेतकऱ्यांचा आवाज

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील बहूतेक भागात शेती खरडा-बर्डाची आहे. यात कधी अस्मानी तर कधी सुल्तानी संकट शेतकऱ्यांच्या मागे उभाच असतात. अशावेळी शेतकऱ्यांना पीककर्ज आवश्यक असते. आतापर्यंत शेतकऱ्यांना ३ लाखापर्यंत पीककर्ज दिले जात असून त्याची मर्यादा वाढवून ता ५ लाखापर्यंत करावे, अशी मागणी



खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली. जिल्हा नियोजन समितीची बैठक दि.१९ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन विभागाच्या सभागृहात संपन्न झाली. यावेळी पालकमंत्री ना. अजित पवार, मंत्री ना. पंकजा मुंडे, आ.प्रकाश सोळंके, आ.सुरेश धस, आ.धनंजय मुंडे, आ.संदीप क्षीरसागर, आ.विजयसिंह पंडीत, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती. ▶▶ उर्वरित पान २ वर

# गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवात उलगडणार महाराष्ट्र घडविणाऱ्या संत, हुतात्मे आणि लोकनेत्यांचा इतिहास

महाराष्ट्र घडविणाऱ्या शिल्पकारांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. या चित्र प्रदर्शनातून समाजाला प्रेरणा देणाऱ्या वैभवशाली परंपरेचा गौरव करण्यात आला आहे, असे सांस्कृतिक कार्य मंत्री ड् आशिष शेलार यांनी सांगितले..

महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या संत, महापुरुष, हुतात्मे आणि लोकनेत्यांचा इतिहास उलगडणाऱ्या गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाचे आयोजन मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात २१ मे पर्यंत करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, माजी खासदार आनंद परांजपे उपस्थित होते.




या चित्रप्रदर्शनात छत्रपती शिवाजी महाराजांपासून आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत मोलाचे योगदान देणाऱ्या मुख्यमंत्री व लोकनेत्यांपर्यंतच्या ऐतिहासिक वाटचालीचे दर्शन घडते. या प्रदर्शनात संत परंपरा, समाजसुधारणा चळवळी, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, तसेच विविध क्षेत्रांतील दिग्गजांचा समावेश करण्यात आला आहे.

महोत्सवाच्या माध्यमातून वैभवशाली परंपरेचा गौरव

सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून, महाराष्ट्र घडविणाऱ्या शिल्पकारांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. या प्रदर्शनातून समाजाला प्रेरणा देणाऱ्या वैभवशाली परंपरेचा गौरव करण्यात आला आहे. राज्यातील जनतेला गौरवशाली महाराष्ट्राची माहिती मिळावी यासाठी हे चित्र प्रदर्शन जिल्ह्यात फिरत्या वाहनाद्वारे आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले त्यांनी सांगितले.

अनेक संत-महापुरुषांचे कार्य, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील हुतात्मे, महाराष्ट्र स्थापनेनंतर राज्याच्या प्रगतीसाठी कार्यरत मुख्यमंत्र्यांचे कार्य भित्तीचित्रांच्या माध्यमातून उलगडण्यात आले आहे

स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवणारे छत्रपती शिवाजी महाराज, सार्वजनिक सत्यधर्म स्थापणारे महात्मा फुले, सामाजिक समतेचा पाया रचणारे छत्रपती राजर्षी शाहू महाराज, संविधानाच्या माध्यमातून देशाला स्वातंत्र्य, समता, बंधूता ही मूल्ये देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अध्यात्माच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन करणारे संत बसवेश्वर, संत सावता माळी, संत नामदेव, संत मुक्ताबाई, संत नरहरी सोनार, संत चोखामेळा, संत कान्होपात्रा यांच्या कार्याची माहिती सांगणारी भित्तीचित्रे या प्रदर्शनात पहावयास मिळतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या ऐतिहासिक लढ्याला सलाम करणारे 'गर्जा महाराष्ट्र' या दालनाअंतर्गत क्रांतिसिंह नाना पाटील, प्रबोधनकार ठाकरे, आचार्य अत्रे, शाहीर शेख जैनू चांद यासह अनेक हुतात्म्यांच्या माहितीद्वारे संयुक्त महाराष्ट्र लढ्याचा इतिहास उलगडला आहे. तसेच समाजसुधारक, तत्वचिंतक, गायक, लेखक, खेळाडू आणि उद्योजक अशा दिग्गजांची माहिती या प्रदर्शनात मांडण्यात आली आहे. राज्याचे आजी-माजी मुख्यमंत्री ज्यांनी राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले अशा सर्व मुख्यमंत्री आणि लोकनेत्यांची माहितीही या प्रदर्शनाद्वारे पहावयास मिळणार

पान १ वरून पुढे...

## बीडच्या विकासासाठी...

पुढील वर्षीच्या प्रस्तावित आराखडयाबाबत सादरीकरण केले. मागील बैठकीतील इतिवृत्तावर या बैठकीत चर्चा होवून त्यास मंजुरी देण्यात आली. गुणवत्तापूर्ण कामे आणि पारदर्शी कामांवर भर द्या व दिलेली कामे वेळेत पूर्ण करा असे सांगून श्री पवार यावेळी म्हणाले की यापुढील काळात निधी जिल्हयाला थेट वर्ग न करता तो मुंबईहुन झालेल्या कामाच्या प्रमाणात जारी करण्याचे धोरण अंमलात आणले जाणार आहे. गतवर्षी ४८४ कोटींचा आराखडा होता परंतू प्रत्याक्षात ४४६.३० कोटी इतका अंतिम आराखडा मंजूर झाला होता यात वर्ष २०२५-२६ करिता १२८ कोटी रुपयांची वाढ करुन तो ५७५ कोटींचा करण्यात आला आहे. २०२२-२३ च्या तुलनेत यंदाचा आराखडा दुप्पट आहे हे उल्लेखनीय. नियोजन समितीमधील कोणतेही काम १५ लाख रुपयांपेक्ष कमी असू नये तसेच कामाचे तुकडे पाडण्यात येवू नयेत प्रस्तावित जागेची मालकी तसेच त्याचे अक्षांश-रेखांश प्रस्तावित सामिल हवे अशा अटी यावर्षी घालण्यात आलेल्या आहेत. कामाच्या ठिकाणी कामाच्या माहितीचे फलक अनिवार्य करण्यात आले असून कामांना प्रशासकीय मंजूरी प्रदान झाल्यावर १५ दिवसात त्याची निविदा प्रक्रिया करणे आवश्यक असेल अशा सर्वसाधारण सूचना नियोजन विभागाने यावर्षी जारी केल्या आहे. वर्ष २०२५-२६ साठी ग्रामीण विकास अंतर्गत जनसूविधा व नागरी विकास २१ कोटी, जिल्हा आरोग्य अधिकारी १८.२ कोटी, जिल्हा शल्य चिकित्सक २८.५० कोटी, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय २० कोटी, प्राथमिक शिक्षण २८. ५० कोटी, जलसंधारण ३६ कोटी, महिला व बाल कल्याण १८. ३९ कोटी, ग्रामीण रस्ते १०५ कोटी रुपये आदीप्रमाणे नियोजन आहे. पशुधन विकासासाठी २२.२८ कोटींचा आराखडा आहे सोबतच राज्य शासन, सी.एस.आर. आणि नियोजन निधिमधून वेगळा दुग्धोत्पादन अर्थात धवल क्रांती योजना राबविण्याचा प्रस्ताव पशुधन विकास तथा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिला. तो या बैठकीत स्विकारण्यात आला. यासोबत नागरी क्षेत्र विकास ६३. ६६ कोटी, उर्जा विकास ३१ कोटी, पोलीस व तुरुंग आस्थापना १६.३५ कोटी, महसूल व आपत्ती व्यवस्थापन ७. ४३ कोटी, क्रींडागण विकास ४.२० कोटी रुपय असे नियोजन या आराखडयात आहे.

## अजित दादांनी...

उपमुख्यमंत्र्यांनी आक्षेप घेत विचारणा केली आहे. बैद्यनाथ मंदिरांच्या पूर्वेला असणाऱ्या द्वारासमोरील पायऱ्याचे काम सुरू आहे. काम करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टरला अजित पवारांनी पायऱ्याच्या कामाच्या दर्जावरून सुनावले आहे. वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा चे कन्सल्टंट कृष्णकुमार बांगड यांनी या विकास आराखडा बाबतची माहिती दिली. यावेळी मंदिराच्या पूर्व द्वारासमोर असलेली दगडी कमान, क्यू कॉम्प्लेक्स, हरिहर तीर्थ, साऊंड अँड लाईट शोची जागा,प्रदक्षिणा मार्ग, मेरूगिरी उद्यान या कामांची माहिती अजित पवार यांनी जाणून घेतली. यावेळी श्री बैद्यनाथ देवस्थान ट्रस्टकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच प्रभू वैद्यनाथाची प्रतिमा पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. अजित पवार यांचे जंगी स्वागत,शंभर किलो फुलांचे हार- राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे बीडचे पालकमंत्री झाल्याच्या नंतर प्रथमच परळी दौऱ्यावर आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कडून त्यांचे जंगी स्वागत केलं गेलंय.यावेळी परळी शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक,राणी लक्ष्मीबाई टावर आणि वैद्यनाथ मंदिर परिसरामध्ये शंभर शंभर किलो फुलांचे हार

पान १ वरून पुढे...

क्रेनवर लावण्यात आले होते. परळी वैजनाथ येथील मंदिरात दर्शन घेतल्यानंतर त्या ठिकाणी करण्यात आलेल्या विकास कामाची पाहणी अजित पवार करणार आहेत आणि त्यानंतर शासकीय विश्रांती येथे परळी विधानसभा मतदारसंघातील विकास कामांसाठी आढावा घेतला आहे. आज उपमुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यानिमित्त मोठा बंदोबस्त देखील तैनात करण्यात आलेला आहे. वैद्यनाथ मंदिरात तिन्ही नेत्यांकडून रुद्राभिषेक- उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे यांनी वैद्यनाथाला मंत्राच्या जयघोषात रुद्राभिषेक केलाय. यानंतर महाआरती करण्यात आली.

## उज्ज्वल निकम...

विष्णू चाटे याने दाखल केलेले डिस्चार्ज अप्लिकेशन मागे घेतले आहे. मूळ फिर्यादी असलेल्या शिवराज देशमुख तसेच सुनील केद्र शिंदे आणि शिवाजी थोपटे यांनी न्यायालयासमोर म्हणणं मांडलं आहे. तसेच आरोपी विष्णू चाटे याने लातूरवरून बीड जिल्हा कारागृहात येण्यासाठी केलेल्या अर्जावर न्यायालय निर्णय देणार आहे. आरोपीचे वकील ॲड. विकास खाडे म्हणाले की, आजची नेमलेली तारीख वात्मीक कराड यांच्या डिस्चार्ज अर्जासाठी होती. तीन मूळ फिर्यादी यांनी त्यांचे म्हणणे सदर केले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३ जून रोजी होणार आहे. हत्या प्रकरणातील जो इलेक्ट्रॉनिक पुरावा आहे. तो आरोपींना मिळणे गरजेचे आहे. तो आरोपींसाठी महत्वाचं आहे. म्हणून आम्ही पेनड्राईव्हची मागणी केली आहे. काही पुरावे दिलेले आहेत. काही पुरावे मिळणे बाकी आहे. काही पुरावे कोर्टात सादर नाहीत, ते देखील न्यायालयात सादर केले जाणार आहेत.

## तुम्ही आ. विजयसिंह...

करण्यात आले. यावेळी पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. श्रीमती पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, आ. सतिष चव्हाण, आ. विक्रम काळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे प्रदेशाध्यक्ष, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष स्वप्नील गलधर, माजी आमदार संजय दौंड, राजकिशोर मोदी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी ना. अजितदादा पवार यांच्या हस्ते विकास कामांचे उद्घाटन व अतिक्रमण धारकांना पि. टी. आरचे वाटप करण्यात आले. यावेळी आपल्या प्रास्ताविकात बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, विधानसभा निवडणुकीच्या विजयानंतर पाच महिने २६ दिवसात निवडणूक प्रचारात दिलेल्या आश्वासनांची पुर्तता करण्याचा प्रयत्न केला. अजितदादा यांच्या मार्गदर्शनाखाली बरीच विकासकामे कामे झाली. शहरातील मतदारांनी शिवछत्र परिवाराच्या बाजूने तीन दशकांनंतर कौल दिला. अजितदादांचा वादा पक्का होता म्हणून भरभरुन आशिर्वाद दिले. आता अपेक्षा वाढल्या आहेत. लोकांच्या अपेक्षा माझ्याकडे आणि माझ्या अपेक्षा तुमच्या दादा तुमच्या कडे आहेत असे सांगून गेवराई बायपास ते बायपास सिमेंट रस्ता गेवराई शहराची हद्दवाढ, अचानकनगर येथील नागरिकांना घरकुल, गेवराई शहर स्वच्छ करण्यासाठी भुमिगत गटार, सिंदफनेचे पुनर्जिवन या व ईतर कामासाठी निधी मंजूर करुन द्यावा अशी मागणी त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी बोलताना ना. पंकजा मुंडे म्हणाल्या की, अनेक वर्षे गेवराईची गोर गरिब जनता हक्काच्या पिटीआरची मागणी करत होती ती विजयसिंह पंडित यांनी

पान १ वरून पुढे...

पुर्ण केली. आ. विजयसिंह लोकांसाठी तळमळीने काम करत आहेत असे सांगून त्यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या कामाचे कौतुक केले.

महेश दाभाडे आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादीत दाखल- कार्यक्रमात गेवराईचे माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी ना. अजितदादा पवार यांनी त्यांचे स्वागत करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महेश दाभाडे यांच्यासह सचिन मोटे, कृष्णा मुळे, मंजूर बागवान, विलास सुतार, विलास थोरात यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. कार्यक्रमात गेवराई येथील साईनाथ सुर्यवंशी, मैनाबाई सानप, सलाउल्ला पठाण, बेबी शेख, सुनिता बनसोडे, संगीता गायकवाड, प्रल्हाद पाळेकर यांच्यासह आकरा नागरिकांना पिटीआरचे प्रातिनिधिक वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगर पालिकेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी मानले. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित यांच्यासह सर्व संस्थाचे पदाधिकारी व कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निष्क्रिय पालकमंत्री...

रामधन जमाले, आसाराम माने यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने निदर्शने करत असताना त्यांना पोलिस प्रशासनाने आंदोलन करत असताना पकडून पोलिसांच्या गाडीत टाकून शिवाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये नेले आणि २ अडीच घंटे शिवाजीनगर पोलिस स्टेशनला बसवुन ठेऊन अजितदादा बीडमधून गेल्यानंतरच सोडून दिले. अजितदादांची टगेगिरी बीड जिल्हा सहन करणार नाही ; लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी : डॉ.गणेश ढवळे - दि.१९ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस अधीक्षक कार्यालय आणि शिवाजीनगर पोलिस स्टेशन यांना देऊन त्यांची आवक जावक घेतलेली आहे. तशा दैनिकात बातम्या १७,१८ तारखेला प्रसिद्ध झाल्या आहेत. आंदोलनकर्ते यांनी आक्षेपार्ह घोषणाबाजी केली नाही तसेच काळे झेंडे दाखवले नाही , अजितदादांची गाडी अडवली नाही. केवळ ५ आंदोलनकर्ते लोकशाही मार्गाने आंदोलन करत होते. माझ्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात येणार होते परंतु शुक्रवार पासुन ४ दिवस मी डॉ.आनिल बारकुल यांच्या दवाखान्यात आयसीयु मध्ये अडमिट आहे. मला दररोज रक्त चढवावे लागत असल्याने चक्कर येऊ शकते म्हणून आंदोलनास जाण्यासाठी परवानगी दिली नाही म्हणून मी आंदोलनात सहभागी नव्हतो. परंतु लोकशाही मार्गाने आंदोलन करणारांची पोलिस प्रशासनाकडून मुस्कटदाबी आणि अजितदादांची टगेगिरी बीड जिल्हा सहन करणार नाही अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे लिंबागणेकर यांनी दिली आहे.

## धनंजय मुंडे...

मध्ये प्रस्तावित संच क्रमांक ९ ची उभारणी करणे, राख प्रदूषण नियंत्रण उपाययोजना जुन्या विश्राम गृहाचे नूतनीकरण, संच क्रमांक ६ ते ८ साठी स्वतंत्र प्रशासकीय इमारत आदी मागण्याना सकारात्मक प्रतिसाद देत अजितदादा पवार यांनी याबाबत चे प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना दिले आहेत. माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी याबाबत सातत्याने मागणी केली होती, त्यानुसार या प्रस्तावाच्या

पान १ वरून पुढे...

अनुषंगाने आज संबंधित अधिकारी यांनी अजितदादा पवार यांच्या समक्ष सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी या सर्वच मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली आज औष्णिक विद्युत केंद्रातील विविध मागण्यांसह परळी वैद्यनाथ येथील श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या कामांचाही समग्र आढावा घेण्यात आला. माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या सहमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नातून वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थस्थळाच्या व परिसराच्या विकासासाठी राज्य सरकारकडून २८६.६८ कोटी रुपयांच्या आराखड्यास मान्यता दिल्यात आलेली असून यातून विविध विकास कामे सुरू आहेत. या कामांना निधीची कमतरता कुठेही भासू देणार नाही मात्र अत्यंत दर्जेदार पद्धतीने व ठराविक वेळ येथे कामे पूर्ण केली जावीत असे अजित दादांनी स्पष्ट केले. बैठकीस अजितदादांसह मंत्री पंकजाताई मुंडे, माजी मंत्री धनंजय मुंडे, आयुक्त राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांसह संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते. दरम्यान धनंजय मुंडे यांनी या मागणीस सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल उपुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

## खा.सोनवणेंनी ...

यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्यातील महत्वाच्या विषयाला हात घालत बीडसाठी रेल्वे हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. अहिल्यानगर ते परळी रेल्वेमार्गाचे काम सुरू आहे. परंतु मध्यल्या काळात रेल्वेचे रूळ अंथरण्याच्या कामासोबत विद्यूत जोडणीचे काम त्याच वेगाने होणे आवश्यक होते. विद्युत जोडणीस होत असलेल्या विलंबामुळे रेल्वेची हायस्पीड चाचणी होऊनही रेल्वे बीडपर्यंत येऊ शकलेली नाही. दरम्यान, रेल्वे विभागातील ओव्हर ब्रिज, अंडर ब्रिज तयार करीत असताना त्यात अडचणी येतात. त्या सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. पालकमंत्री अजित पवार यांनीही यात लक्ष घातल्यास अनेक अडचणी सुटून रेल्वे कामाला हायस्पीड गती मिळेल, येणाऱ्या काळात बीडला रेल्वे येईल आणि जिल्हयाच्या विकासाला चालना मिळेल, असेही खा.सोनवणे म्हणाले. खा.सोनवणेंनी शब्द टाकला अन् दादांकडून होकार- अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गाचे रात्रंदिवस काम सुरू आहे परंतु याचसोबत धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वेची मागणी देखील पुढे आलेली आहे. आपण केंद्रात यासाठी आवश्यक पाठपुरावा करत आहोत, असे सांगत खा.सोनवणे यांनी धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वेमार्ग प्रकल्पासाठी राज्यशासनाने अर्धा हिस्सा देण्यात यावा, अशी महत्वपुर्ण मागणीही उपमुख्यमंत्री अजीत पवार यांच्याकडे केली. यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी देखील ही मागणी मान्य केली. झेडपीच्या अतिरिक्त कारभाराच्या विषयावर चर्चा- जिल्हा परिषद प्रशासनात काही कर्मचारी प्रशासकिय बदल्यानंतरही अतिरिक्त काम काजाच्या नावाखाली पुन्हा त्याच ठिकाणी पदभार घेतात. मागील दहा वर्षांपासून जिल्हा परिषदेत जवळपास ७७ कर्मचारी असेच काम आहेत. यामुळे अशा कर्मचाऱ्यांकडे असलेला पदभार काढून त्यांना मुळे ठिकाणी पाठवावे, अशी भुमिकाही खा.बजरंग सोनवणे यांनी मांडली. यावेळी या विषयावर अधिकाऱ्यांनी चर्चा करून कार्यवाही करू, असे सांगितले. बोगस पिकविम्यावरही उठवला आवाज -बीड जिल्ह्यात मागील काळात बोगस पीक विमा भरून परळी भागातील लोकांनी कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. याप्रकरणी तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणीही खा.सोनवणे यांनी केली.

पान ४ वरून पुढे...

## छत्रपती शंभुराजे...

श्री जीवन धांडे ९७६५६८८०९२ या नंबर वर रविवार दिनांक २५ मे २०२५ पर्यंत नाव नोंदणी करावी नोंदणी झाल्यानंतर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीची तारीख कळवली जाईल व त्या दिवशी मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केला जाईल तरी जास्तीत जास्त मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करावी असे आवाहन बुलंद छावा सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे.

## आ.सुरेश धस...

यशस्वीपणे केली. आ.सुरेश धस हे रुग्णांचा ईलाज करण्यासाठी त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यासाठी रुग्णसेवा देण्यासाठी नेहमी तत्पर असतात, ज्या गरिबांजवळ असाध्य रोगांवर उपचार करवून घेण्यासाठी पैसा नाही, ज्यांना मरणाशिवाय पर्याय नाही अशा रुग्णांना मदतीचा हात देण्याची भावना मनात असल्याने मतदार संघातील ग्रामीण भागांत राहणाऱ्या गरीब व कोणीही वाली नसलेल्या रुग्णांना स्वास्थ्य सुविधा

पान ४ वरून पुढे...

पुरवविण्याचे काम करीत आहे.याच हुतात भावनेने शहादेव नरवडे यांना ६ लाख रुपयांची मोफत शस्त्रक्रिया मुंबई येथील रुग्णालयात आ.सुरेश धस यांच्या माध्यमातून यशस्वी करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर नरोडे हे ठणठणीत बरे झाले असून आमदार सुरेश धस यांच्या या जागरूकपणामुळे फार मोठा आरोग्याचा प्रश्न मार्गी लागल्यामुळे नरवडे परिवाराने आभार मानले.

## खालीलपैकी योजनेच्या...

जातीचा दाखला व आधार कार्डची मूळ प्रतिसोबत ठेवावी. अधिक माहितीसाठी वरील कार्यालयास संपर्क साधावा संपर्क क्रमांक० २४४२-२९५०२४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन वसंतराव नाईकवि.जा.व.भ.ज. विकास महामंडळ येथे संपर्क साधावा.

## शहरातील विकास...

इ करुन रस्ते दुरुस्त करावेत अन्यथा लोकशाही पद्धतीने उग्र आंदोलन करण्यात येईल.आंदोलणावेळी जनतेचा रोश कुठल्या थराला जाईल हे

पान ४ वरून पुढे...

सांगता येणार नाही व झालेल्या परीस्थितीला ते स्वतः जबाबदार राहतील त्यामुळे दोन दिवसांच्या आत मुरुम टाकुन रस्ते सुरळीत करुन द्यावे अशी मागणी शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांकडून केली जात आहे. शहरातील जलवाहिनीच काम दर्जेदार सुरू असून ज्या ठिकाणी रस्ते खोदण्यात आले आहेत त्यांचे पॅचवर्क चे काम काही कालावधीनंतर करण्यात येणार आहेत तातडीची उपाययोजना म्हणून रस्ते सुरळीत करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना लवकरच मार्गी लावणार असल्याचे पाणीपुरवठा विभागाकडून सांगण्यात आले.

## संत जयगुरु...

कु. श्रावणी मधुकर डोंगरे ८५.६०%, कु.लक्ष्मी नारायण परदेशी ८४.८०%, कु. श्रद्धा नितीन रंगदळ ८४.४०%,चि.गणेश ज्ञानेश्वर परदेशी ८३.८०%, चि. शेख अरमान रौफ ८२.५०%, चि. शेख नुमान आलम ७८.८०%, कु.पायल अरुण डोंगरे ७६.००% कु. शेख अकिब मुनीर ७०.००% या प्रमाणे अनेक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व शाळेच्या या

पान ४ वरून पुढे...

घवघवीत यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सौ. विद्याताई डोंगरे, शाळेचे मुख्याध्यापक श्री. जितेंद्र डोंगरे सर यांच्यासह शिक्षक व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी, माळापुरी गावातील शिक्षण प्रेमी नागरिक आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## आंदोलक अजय....

विश्वासात घेऊन हे उपोषण थांबवण्यासाठी प्रयत्न करावा अशी गावकऱ्यांनी व शिवप्रेमींनी मागणी केली आहे. उपोषणास बसलेले अजय भारत काळे यांना ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध करून द्यावी व त्यांना आंदोलनापासून परावृत्त करावे नेकनूर ग्रामपंचायत अंतर्गत कोठेही विनापरवाना छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसणार नाही याची दक्षता घ्यावी विनापरवाना छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसवल्या सर्व जबाबदारी ग्रामपंचायतची राहील अशा आशयाचे पत्र साहेब पोलीस निरीक्षक नेकनूर यांनी ग्रामपंचायतीला काढले आहे

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# बीड मतदारसंघातील महत्वकांक्षी कामांना ना.अजितदादांकडून सकारात्मक मंजुरी

## आ.संदीप क्षीरसागरांनी मानले बीड मतदारसंघाच्या वतीने आभार



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि.१९) रोजी झालेल्या नियोजन समितीच्या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघाच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाकांक्षी असलेले विविध विषय आणि विकासकामे ना.अजितदादा आणि समितीसमोर प्रस्तावित केली. त्यावर ना.अजितदादांनी प्रस्तावित केलेल्या विविध कामांना विकास निधी देण्यासाठी सकारात्मकता दर्शवत, निधी मंजूरीसाठी आदेशीत केले. तसेच बीड मतदारसंघातील अनेक महत्वाच्या कामांना मंजुरी दिली. त्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजितदादांचे बीड विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आभार मानले आहेत.

खालील कामांना मिळाली मंजुरी- बीडच्या विमानतळ उभारणी करता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी जागेची तांत्रिक क्षमता तपासणी करता प्रस्ताव सादर केलेला आहे. लवकरच हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला आहे. बीड शहरात सेंटर फॉर इनोव्हेशन च्या उभारणीबाबत टाटा टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संमती दर्शवली आहे. त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी. शहरातील विद्यार्थी, विज्ञान व संशोधन प्रेमी तसेच नागरिकांसाठी सायन्स पार्क आणि तारांगण प्रस्तावास मान्यता देण्यात आली. जिल्हा रुग्णालय, बीड येथे शहरी व ग्रामीण भागातील रुग्णांसाठी महत्वाच्या सुविधा करिता भरीव निधीला मान्यता देण्यात आली. बिंदुसरा प्रकल्प तसेच बीड मतदार संघातून जाणार्या बिंदुसरा नदी पात्रात स्वच्छता व सुशोभीकरण कामे होणार आहेत.

जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सिंथेटिक ट्रॅक व विविध क्रीडा सुविधा निर्माण करण्याची मागणी केली. बीड जिल्हा ग्रंथालय इमारत बांधकाम करण्यासाठी रोल मॉडेल तयार करण्याचे सुचविले.

बीड शहरातील खुले भूखंड व उद्यान विकसित करण्यात येणार आहेत. शहरातील महत्त्वाचे डीपी रस्ते निर्माण करण्यात येणार आहेत. शहरातील महत्त्वाच्या चौकांचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. घनकचरा व्यवस्थापन व पाणी व्यवस्थापन करण्यात येणार आहे. बीड मतदार संघातील पर्यटनाचे स्थळ असलेले युवा शांतीवन व सह्याद्री देवराई या ठिकाणी वन विभागामार्फत विविध विकासकामे करण्यात येणार आहेत.

## स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आवश्यक सुविधा निर्मितीला प्राधान्य - उपमुख्यमंत्री अजित पवार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हे ग्रामीण भागात तालुक्याच्या ठिकाणी असलेले एक महत्वाची आरोग्य संस्था आहे. या संस्थेला ५० वर्षे पूर्ण होत असून याठिकाणी नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, पायाभूत सुविधा निर्मितीसाठी निधी दिला जाईल. या निधीतून प्राधान्यक्रम निश्चित करून आवश्यक सुविधा निर्मिती करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज येथे दिले.




स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आयोजित आढावा बैठकीत उपमुख्यमंत्री श्री. पवार बोलत होते. पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, खासदार बजरंग सोनवणे, आमदार विक्रम काळे, आमदार धनंजय मुंडे, आमदार नमिता मुंदडा, माजी आमदार संजय दौंड, अक्षय मुंदडा, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, आरोग्य सहसंचालक डॉ. शिल्पा दमकुंडवार, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बी. एम. थोरात यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## संग्राह्य असे बीड कॉफी टेबल बुक : अजित पवार

**● नियोजन समितीच्या बैठकीत झाले विमोचन**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याची सचित्र आणि उत्तम अशी मांडणी कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून करण्यात आली आहे. हे पुस्तक कुणालाही आपल्या संग्रही ठेवावे असे वाटेल असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बीड या पुस्तकाच्या विमोचन प्रसंगी केले. बीड जिल्हा माहिती कार्यालयातर्फे नियोजन निधीतून हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे जिल्हा नियोजन समितीच्या आज झालेल्या बैठकीत हा विमोचन सोहळा पार पडला.



यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार सुरेश धस, आमदार प्रकाश सोळंके, आमदार धनंजय मुंडे आमदार नमिता मुंदडा, आमदार विजयसिंह पंडित उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने तसेच पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख उपस्थिती होती.

# आदर्श माध्यमिक विद्यालय जेबापिंपरी शाळेच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचे गेट टुगेदर उत्साहात संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

माध्यमिक विद्यालय जेबापिंपरी या शाळेत शैक्षणिक वर्ष २००३-२००४ मध्ये दहावी उत्तीर्ण झालेल्या बॅचच्या विद्यार्थी वर्ग मित्र-मैत्रिणींनी २१ वर्षा नंतर एकत्र येऊन गेट टुगेदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक आणि माध्यमिक या कालावधीतील शिक्षण त्यांच्या जीवनातील पायाभरणीचा कार्यकाळ असतो. या काळातील शिक्षकांबरोबर विद्यार्थ्यांची वेगळी जवळीक असते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी त्यावेळी शिकवण्यासाठी असणाऱ्या शिक्षकवृंदांना कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बोलावून शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देत आनंद व्यक्त करत उत्साहात कार्यक्रम साजरा केला. येथील जिल्हा परिषद शाळा आणि आदर्श माध्यमिक विद्यालय जेबापिंपरी या शाळेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी शाळेत गेट टुगेदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला जेष्ठ शिक्षक बाबासाहेब चव्हाण



सर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. श्रीमंत चौधरी सर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. चंद्रशेखर कदम सर, श्री. रविंद्र करांडे सर, जोगदंड मामा यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी अखंड हिंदुस्थानचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आणि दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना श्री. रविंद्र करांडे सरांनी शाळेतील जुन्या आठवणी ताज्या करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तर श्री. चंद्रशेखर कदम सर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, मला अनेक गेट टुगेदर च्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचा योग आला. परंतु माझ्यासाठी हा कार्यक्रम अविस्मरणीय आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनंत जोगदंड यांनी केले. तर सुत्रसंचलन आणि शेवटी आभार बप्पासाहेब हावळे यांनी मानले. या कार्यक्रमाला अशोक ढास, अविनाश शिंदे, सचिन चौधरी, अमोल चौधरी, अंकुश फाटक, दिगंबर पोकळे, मोहन काटेकर, नितीन नाईकवाडे, सुकमल देवगुडे, आम्रपाली शिंदे, अर्चना वाघ, सरिता लहाने, कोमल देवगुडे, कीर्ती जगदाळे, विद्या मंचुके, सुषमा शिंदे, अर्चना निर्मळ आदी विद्यार्थी उपस्थित होते.




## शेतक-यांनी डीएपी खतास पर्यायी खते वापरावी

**बीड । प्रतिनिधी**

शेतकरी बंधूनी डिएपी (Di-mmonium Phosphate) खतास पर्यायी खते वापरावीत महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमिन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरीता अग्रेसर आहे. राज्यामध्ये सद्या पेरणीला सुरुवात झाली असून डिएपी खताची शेक-यांकडून जास्त मागणी आहे. डिएपी खता मध्ये १८ ट्क्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत. डिएपी खताची कमतरता भरुन काढण्यासाठी पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी (Single Super Phosphate) या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-१६ ट्क्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात.




## जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांचे कार्यालय

**शासकीय ईमारत, चांदमारी वसाहत, धानोरा रोड, बीड- ४३११२२**

दुरध्वनी क्र.०२४४२-२२२५८६ ई-मेल dsorbeed@yahoo.com

क्रमांक/आस्था-२/एस. आर. १६२ / २०२३ — बीड दिनांक- २५/०४/२०२५

### जाहीर सुचना

प्रति,
अपीलदार: १. शाहराव बाजीराव भावले, रा. धानगरवाडी, पो. पाली, ता. जि. बीड

विरुध्द

जाबदार :
१. तुळशीराम राघु भावले.
२. अशोक सखाराम भावले,
३. आश्रुबा नागु भावले.
४. रंगनाथ सुदाम भावले,
५. सखाराम लिंबा भावले.
६. सुग्रीव लक्ष्मण भावले,
७. कमल तुळशीराम भावले.
८. सुक्शाला कालीदास भावले,
९. मोहन लिंबाजी भावले.
१०. जगन्नाथ लिंबा भावले.
११. बाजीराव तुका लकडे,
१२. राजाराम तुका भावले,
१३. भाऊसाहेब नागु भावले,
१४. रावसाहेब नागु भावले,
१६. यशवंता दशरथ भावले.
१५. चत्रभुज दशरथ भावले,
१७. बंड महादेव भावले.
१८. मधुकर धोंडीबा भावले,
१९. सुग्रीव धोंडीबा भावले,
२०. लिंबाजी राघुजी भावले (मयत) वारस
२०.१. जगन्नाथ लिंबाजी भावले,
२०.२. मोहन लिंबाजी भावले,
२१. बापुराव तात्याहरी भावले,
२२. विमल चत्रभुज भावले,
वरील सर्व रा. धनगरवाडी, पो.पाली, ता.जि.बीड
२३. उप अधीक्षक भूमि अभिलेख, बीड

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करण्यात येते की, अर्जदार यांनी गैरअर्जदार यांचेविरुध्द जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांचे न्यायालयात मौजे धनगरवाडी तहत मंझेरी हवेली ता.जि.बीड येथील सर्व्हे नंबर ९९ हिस्सा क्र. १ मधील पोटहिस्सा मोजणी फाळणी फेरफार रद्द करणे बाबत महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील अर्ज दाखल केलेले आहे.

वरील गैरजअर्जदार यांना जाहीर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, वरील प्रकरणी दिनांक २८/०५/२०२५ रोजी वेळ सकाळी ११:३० वाजता जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख बीड यांचे कार्यालय, चाँदमारी शासकीय वसाहत, पालवण चौकाजवळ, धानोरा रोड, बीड ता. जि. बीड यांचे समोर सुनावणी आहे. वरील नमुद गैरअर्जदार यांनी नमुद तारखेस न्याय कक्षेत सुनावणीस उपस्थीत रहावे.

**वरील नमुद गैरअर्जदार, वरील नमुद तारखेस गैरहजर राहील्यास प्रकरणात एकतर्फी सुनावणी येईल व प्रकरण पुढे चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

शिक्का

स्वाक्षरीत/-
(कृष्णा शिंदे)
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
मंगळवार, दि.२० मे २०२५ पान ४

## भाऊसाहेब लोणकर यांचे दुःखद निधन



**कल्याण। प्रतिनिधी**

भाऊसाहेब लोणकर हे आठ दिवसापूर्वी अस्वस्थ वाटू लागल्याने कल्याण येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी ऍडमिट होते. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचे रविवार दिनांक १८ मे रोजी पहाटे ४:०० वा. वयाच्या ७० व्या वर्षी रुग्णालयामध्ये दुःखद निधन झाले. भाऊसाहेब लोणकर हे मूळ गेवराई तालुक्यातील जळूका या गावचे होते. कामानिमित्त कल्याण येथे गेले व अनेक वर्षापासून तिथेच स्थायिक झाले होते. ते मनमिळाऊ स्वभावाचे असल्याने ते सर्व परिचित होते. त्यांच्या जाण्याने नातेवाईक व मित्र परिवारांमध्ये शोककळा पसरली आहे. त्यांच्यावर रविवार रोजी कल्याण येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी जनाबाई लोणकर, मुलगा काकासाहेब (सागर) लोणकर, मुलगी उर्मिला लोणकर , सुन नातवंडे असा परिवार आहे. लोणकर परिवाराच्या दुःखात दैनिक मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे.

# राज्य महामार्गाच्या कामासाठी वृक्षांची केली कत्तल

## वटवृक्षाची कत्तल झाली त्याजागी रोपांची लागवड कधी होणार?

**केज । प्रतिनिधी**

सध्या सर्वत्र महामार्गाचे काम धावत्या गतीने सुरू आहे . अंबाजोगाई केज बीड या मार्गे जाणाऱ्या महामार्गाचे काम करण्यासाठी महाकाय वटवृक्षाची कत्तल करण्यात आली. यावेळी वृक्षाच्या मनातील भावना म्हणजे मज जगवायचे राहून गेले अशी म्हणून त्या भल्यामोठ्या वटवृक्ष आणि आपले डोळे मिटले आहेत त्यांना पुनर्जीवित करता आले असते रस्त्याच्या बाजूला पुनर्रोपण करता आले असते मात्र याकडे दुर्लक्ष करण्यात आले. या बदल्यात रस्त्याच्या दुतर्फा रोपांची लागवड करण्यात येणार असा फतवाही निघाला मात्र प्रत्यक्षदर्शी अद्यापपर्यंत कोणतेही रोप लावले गेले नाही यामुळेच विकासाकडे जाणारे महामार्ग हे विनाशाकडे जातात की काय असा प्रश्न निसर्ग प्रेमींमध्ये निर्माण झाला आहे वृक्षाचे पुनर्जीवन करावे व रस्त्याच्या दुतर्फा हा रस्त्याची लागवड करावी अशी मागणी केली जात आहे

सध्या रस्त्याच्या बाजूला



अनेक मोठ्या झाडांचे अवशेष पडलेले आहेत मुख्यत्वेकरून वटवृक्ष नामशेष झाले आहेत त्याचे पुनर्जीवन करता आले असते परंतु याकडे मात्र कोणी लक्ष घातलेच नाही मागील काही वर्क वर्षापूर्वी लातूरमध्ये वटवृक्षाचे पुनर्रोपण करण्याचा प्रयोग यशस्वी झाला होता असाच उपक्रम करून अनेक वृक्षांचे संगोपन करता आले असते मात्र याचे कोणास देणेघेणे नाही सध्या सर्वत्र वृक्षतोड खुलेआम चालू आहे वनीकरण विभाग पाहतो आहे वृक्षलागवड केवळ कागदावरच होते शतकोटी वृक्ष लागवडीचा बोजवारा उडालेला सर्वश्रुत आहे

या प्रकरणी वृक्ष मित्रांनी यासाठी मंत्रालयात मागणी केली मात्र याकडे कोणी लक्ष घातले नाही परिणामतः सर्व वृक्षांची कत्तल झाली आहे सध्या रस्त्याच्या दुतर्फा या वृक्षांचे अवशेष पडलेले आहेत याकडे बघून नवी पालवी कधी फुटणार कधी उगवणार आणि पर्यावरणाचे संवर्धन कधी होणार असा प्रश्न उभा आहे याची दखल घेऊन वृक्षलागवड तत्काळ व्हावी अशी मागणी केली जात आहे

रस्त्याच्या कडेला असलेले भलेमोठे वृक्ष तोडण्यात आले झाडांच्या कत्तली झाल्या त्याच्या बदल्यात झाडे लावण्याची जबाबदारी गुत्तेदार, प्रशासन की नेमकी कोणाची हा प्रश्न अनुत्तरित आहे.

**▶ तोडलेल्या झाडांच्या बदल्यात नवीन चार रोपांची लागवड करून त्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे. अन्यथा दळणवळणासाठी केलेला विकास हा माणसांना भकास करेल, या पावसाळ्यात तात्काळ रोपांची लागवड न झाल्यास अन्नत्याग सत्याग्रह करणार आहे. – वृक्षमित्र डॉ हनुमंत सौदागर केज**

# छत्रपती शंभुराजे जयंती निमित्त दहावी,बारावी मराठा गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मानासाठी

## नाव नोंदणी करण्याचे बुलंद छावाचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त बुलंद छावा संघटनेच्या वतीने दहावी, बारावी मराठा गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न होणार आहे तरी दहावी, बारावी मराठा गुणवंत विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करावी.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी होणार आहे. यावर्षी वर्ष दहावे असून यावर्षी जयंती निमित्त व्याख्यान व मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष प्राविण्यसह



मिळवलेल्या यशाबद्दल त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सन्मान होणार आहे इयत्ता दहावीच्या ज्या विद्यार्थ्यांना ९०% च्या पुढे मार्क आहेत व इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना ८५% च्या पुढे मार्क आहेत अशा विद्यार्थ्यांचा सन्मान होणार असून अशा विद्यार्थ्यांनी किंवा पालकांनी खालील दिलेल्या मोबाईल नंबर वर नाव नोंदणी करावी श्री विठ्ठल बहीर ९२७२७२०२०२ श्री नारायण गवते ८३८०८४७८४२ श्री आजिनाथ आदमाने ९८२३१३२३२३ ▶▶ उर्वरित पान २ वर

# आ.सुरेश धस यांच्या पुढाकाराने शहादेव नरवडे यांच्यावर मुंबई येथे शस्त्रक्रिया

## ६ लक्ष रुपयांपर्यतची मोफत शस्त्रक्रिया ; नरवडे कुटुंबियांनी मानले आ.धसांचे आभार

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी मतदारसंघाचे लोकनेते आमदार सुरेश धस यांची मतदार संघामध्ये निरंतर रुग्णसेवा सुरू असून त्यांनी आत्तापर्यंत शिक्षण, आरोग्य, महिलांचे प्रश्न अशा विविध प्रश्नांवर त्यांनी चांगले काम केलं आहे. ते सातत्याने नाविन्यपूर्ण काम करण्यात अग्रेसर असतात. असेच त्यांच्याकडे आरोग्याचा विषय घेऊन जाणाऱ्या व्यक्तीला ते नेहमी सहकार्यची भावना मनात ठेवत मदतीचा हात दिला आहे.

आष्टी तालुक्यातील बीडसांगवी येथील शहादेव नरवडे यांची गेल्या अनेक दिवसांपासून



गुडघ्याचा जॉईंटाचा त्रास होत असल्याकारणाने त्यांनी दोन ते तीन वेळा मुंबई व पुणे येथे ऑपरेशन केले परंतु त्यावरही त्यांचा त्रास कमी झाला नाही. त्यानंतर त्यांना डॉक्टरांनी ऑपरेशन करण्याचा सल्ला दिल्याने या ऑपरेशनसाठी पाच ते सहा लक्ष इतका खर्च खाजगी रुणालयांमध्ये येत होता तेव्हा त्यांनी आ.सुरेश धस यांची भेट घेत आपल्या वेदना सांगताच तात्काळ आमदार सुरेश धस यांनी या रुग्णाची मदत करण्याच्या हेतूने मुंबई येथील नामांकित हॉस्पिटलमध्ये विविध ट्रस्ट व मुख्यमंत्री सहायता निधीसह धर्मादाय यांच्याशी संपर्क करत विविध माध्यमातून मोफत शास्त्रक्रिया ▶▶ उर्वरित पान २ वर

## खालीलपैकी योजनेच्या कर्जासाठी संपर्क साधवा

**बीड । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक युक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित) तसेच नव्याने स्थापन झालेल्या उपकंपनी, राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, पैलवान कै मारुती-चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा कार्यालयामार्फत राबविण्यात येणा-या योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, १० लक्ष (बँकेमार्फत), गट कर्ज व्याज परतावा रुपये ५० लक्ष (बँकेमार्फत), योजनेचे उद्दिष्ट प्राप्त झालेले आहे. या दोन्ही योजना ऑनलाइन पद्धतीने राबविल्या जात असून अर्जदारांनी तक्षपीं.ळप या वेब प्रणालीवर अर्ज करणे अनिवार्य आहे. तसेच क्रमांक ३ व ४ नुसार २५ टक्के बीज भांडवल कर्ज योजने अंतर्गत महामंडळाचा सहभाग २५ टक्के यास महामंडळाची नियमावली राहील व राष्ट्रीयकृत बँक सहभाग ७५ टक्के यास बँकेची नियमावली राहील असे एकूण रुपये ५ लक्ष असून योजनेचे सन २०२५-२६ आर्थिक वर्षाचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. तसेच रुपये १,००,०००/- थेट कर्ज योजनेअंतर्गत महामंडळाचा सहभाग १०० टक्के असून महामंडळाच्या नियमानुसार कर्ज प्रकरणे जिल्हा कार्यालयात दिनांक २७ मे २०२५ रोजी पासून अर्ज वाटपास सुरुवात करण्यात येणार आहे. या चार योजना महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे. तरी विमुक्त जातीय व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील नवउद्योजक अनुभवी तरुण-तरुणींनी अर्जासाठी स्वतः

▶▶ उर्वरित पान २ वर

# शहरातील विकास कामांकडे मुख्य अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष , विकास कामामध्ये सूसुत्रतेचा अभाव

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

शहराच्या विकासाच्या दृष्टीने शहरात विविध विकासकामे सुरू आहेत पण या कामांमध्ये सुसत्रता नसल्याने अनेक ठिकाणी नागरिकांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे शहरातील सर्व विकास कामांकडे मुख्याधिकाऱ्यांनी जातीने लक्ष देऊन कामाच्या दर्जाकडे व नागरिकांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यात साठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे शहरातील नागरिकांकडून बोलले जात आहे.

धारूर शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे पाणी प्रश्न सोडवण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी विशेष प्रयत्न करून ५२ कोटी रुपयांची योजनेचे काम सुरू केले जलवाहिनी अंथरण्यासाठी शहरातील विविध भागातील रस्ते खोदण्यात आले आहेत या रस्त्यांच्या प्रश्न मार्गी लावणे अत्यंत गरजेचे आहे शहरातील दळणवळण सुरळीत करण्यासाठी



जलवाहिनी अंथरण्याचे काम ज्या भागात पूर्ण झाले आहे त्या भागातील रस्त्यांची कामे मार्गी लावण्याची मागणी शहरातील नागरिकांकडून केली जात आहे तसेच मुख्य बाजारपेठेतील १५ कोटी रुपयांच्या रस्त्याच्या कामाकडेही विशेष लक्ष देऊन संबधित विभागांना काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना करणे आवश्यक आहे जेवण करून येणाऱ्या पावसाळ्यात दळणवळण व आरोग्याच्या समस्या निर्माण होणार नाहीत यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे मागील वर्षी शहरात डेंगूच्या प्रादुर्भावामुळे अनेकांना डेंगू ची लागण झालेली आहे.

शहरातील या भागातील जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे या भागातील रस्त्याची दुरुस्तीची कामे तातडीने मार्गी लावण्याची मागणी शहरातील नागरिकांकडून केली जात आहे मठ गल्ली तिबोले गल्ली,जाधव गल्ली, कुरुंद गल्ली, स्वराज्य नगर, लक्ष्मी नगर सह इतर भागातील महिला पुरुष,वाहणं धारक या ठिकाणी चिखल,दगडातुन पडत असुन ,त्यांना दुखपत होत आहे.तरी मुख्याधिकारी यांनी दोन दिवसांत वरिल सर्व ठिकाणी मुरुम टाकुन दब ▶▶ उर्वरित पान २ वर

## संत जयगुरु माऊली माध्यमिक विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत उज्वल यशाची परंपरा कायम

### कु. साक्षी घवाडे ९२.२०% गुण घेऊन पेंडगाव केंद्रातून प्रथम



**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील माळापुरी येथील संत जयगुरु माऊली माध्यमिक विद्यालय माळापुरी या शाळेचा नुकत्याच घोषित झालेल्या दहावी बोर्ड परीक्षेत उज्ज्वल यश मिळवले. या शाळेचा निकाल ९६.२०% टक्के लागला. शाळेतून कु. साक्षी जयराम घवाडे ९२.२०% गुण घेऊन शाळेसह केंद्रात पहिली आहे. कु. सोनाली सुनील परदेशी ८८.२०% गुण घेऊन शाळेतून द्वितीय तर कु. निकिता ज्ञानेश्वर परदेशी हिने ८७.४०% गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळविला. त्याच बरोबर कु. पुनम अण्णाभाऊ वावरे ८६.४०%

▶▶ उर्वरित पान २ वर

# आंदोलक अजय काळे यांची तिसऱ्या दिवशी तब्येत खालावली उपचार घेण्यास नकार

## नेकनूर येथील आंदोलनाकडे प्रशासनाने फिरवली पाठ ; नेकनूर सहाय्यक पोलीस निरीक्षकांनी बजावली ग्रामपंचायतला नोटीस

**नेकनूर । प्रतिनिधी**

नेकनूर ग्रामपंचायतने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ स्मारक उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी अजयसिंह काळे यांच्यासह शिवप्रेमीनि आमरण उपोषण सुरू केले असून आंदोलनाचा आज तिसरा दिवस असून अजय काळे यांची तब्येत खालावली असल्याने पंचक्रोशीतील शिवप्रेमी तीव्र नाराजी नेकनूर ग्रामपंचायतीवर



व्यक्त करताना दिसून येत आहे.

नेकनूर ग्रामपंचायत समोर ग्रामपंचायतीने स्मारकास जागा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकार्यालय तसेच संबंधित सर्व विभागात कागदपत्रे व्यवहार केला असून अद्याप पर्यंत नेकनूर ग्रामपंचायतने जागे संदर्भात ठोस भूमिका घेतलेली दिसून येत नसल्याने शिवस्मारक बसविण्यासाठी जागेच्या मागणीसाठी उपोषणास बसलेले उपोषण करते अजय काळे यांची तिसऱ्या दिवशी तब्येत खालवली आहे नेकनूरच्या शासकीय रुग्णालयातील डॉक्टर खाकरे यांनी तपासणी केली असता अजय काळे यांनी उपचारास नकार दिला.

ही फक्त उपोषणकर्त्याची मागणी नसून संपूर्ण नेत्यांची मागणी आहे या स्मारकाला कोणाचाही विरोध नसून सरपंच ग्रामसेवक यांनी सर्व ग्रामपंचायत सदस्यांना

▶▶ उर्वरित पान २ वर

## परदेशी शिष्यवृत्ती मुदतवाढ

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील मुला-मुलींना प्रदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना सन २०२५-२६ साठी विद्यार्थ्यांना दिनांक १५. ६. २०२४ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या जाहिरातीमध्ये शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याची मुदत दिनांक १७ मे २०२५ रोजी पर्यंत देण्यात आली होती सदर योजनेस मिळालेला प्रतिसाद विचारात घेता २० दिवसाची म्हणजेच दिनांक ६ जून २०२५ पर्यंत मुदतवाड देण्यात आलेले आहे. तरी परदेशी शिक्षण घेणारे विद्यार्थी यांनी संचालक इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय (साईप्रसाद कॉम्प्लेक्स, महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, येरवडा -४११००६) महाराष्ट्र राज्य पुणे येथे अर्ज सादर करुन लाभ घ्यावा असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक डी.बी. क्षीरसागर यांनी केले आहे. संपर्कासाठी भ्रमणध्वनी क्र. (९९२२९०७५५)

